देहुरोड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे
पत्ता – जुना पुणे मुंबई रोड सेन्ट्रल चौक, ता. हवेली, जि. पुणे
फोन नं. 020-27671288

**प्रेस नोट** **दिनांक - 01/03/2023**

**मा.पो.उपआयुक्त सो, परि.02, पिं.चिं.**

## " पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, अंतर्गत देहुरोड पोलीसांची कामगीरी व्यापा-याचे 20 लाख रुपये लुटणा-या फरार आरोपीच्या मुसक्या आवळल्या"

मागील काही दिवसांपासुन देहुरोड पोलीस स्टेशन परिसर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वारंवार घडणा-या जबरी चोरी, घर फोडी, वाहन चोरी, सायकल चोरीच्या घटनांच्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त सो, यांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे देहुरोड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षाराणी पाटील यांनी पोलीस स्टेशन हद्दीतील रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करणे. जबरी चोरी, वाहन चोरी, सायकल चोरी करणारे गुन्हेगारांकडे तपास करणे, क्राईम मॅपिंग नुसार चैन स्नॅचिंग चे स्पॉट वर पेट्रोलिंग करण्याचे आदेश तपास पथकास दिले होते. त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे देहुरोड पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रेलिंग करत असताना पो.शि. सचिन शेजाळ यांना त्यांचे गुप्त बातमी दारामार्फत बातमी मिळाली की, इसम नामे – रुषीकेश उर्फ शे-या राजु अडागळे, हा साई नगर, पाण्याचे टाकीजवळ हातामध्ये तलवार घेवुन फिरत आहे, अशी माहिती मिळाली. सदरची बातमी त्यांनी सपोनि दिगबंर अतिग्रे, यांना दिली त्यांनी सदरची बातमी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षाराणी पाटील यांना कळवुन सदर आरोपीत यास ताब्यात घेणे करीता देहुरोड पोलीस स्टेशन येथील तपास पथकाचे दोन टिम तयार करण्यात आले. त्याप्रमाणे तपासपथकातील अंमलदार यांनी साई नगर भागात मिळालेल्या बातमी प्रमाणे शोध घेतला असताना एक इसम आम्हास पाहुन पळु लागला त्यामुळे आम्हाला त्याचा संशया आला व आमचे दोन्ही टिमने त्याचा पाठलाग करुन त्यास शिताफीने पकडुन त्याची अंगझडती घेता त्याचे हातात एक तलवार व पॅन्टची आत कमरेला एक कोयता मिळुन आला सदरचे हत्यार आम्ही ताब्यात घेतले व त्यास ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन येथे आणले त्याचेकडे अधिक तपास करता त्याने दौंड येथे 2 वर्षापुर्वी एका व्यापा-याचे 20 लाख रुपये लुटल्याचे कबुल केले, सदर आरोपीवर देहुरोड पो.स्टे. येथे गुन्हा रजि.नं. 160/2023 भा.ह.का.कलम 4(25) सह महा. पो. अधि. कलम 37(1)(3) सह 135 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच सदर आरोपीत याचे अभिलेख तपासता त्याचेवर देहुरोड पोलीस स्टेशन, तसेच इतर पोलीस स्टेशन मध्ये दरोडा, जबरी चोरी, चोरी, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न अशा प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपी हा खालील गुन्ह्यात पाहिजे आरोपी होता.

1) दौंड पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. 610/2021 भा.द.वि.स कलम 395,120 (ब),201 प्रमाणे.

सदरची कामगीर ही मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड श्री. विनय चौबे सो, मा. सहा. पोलीस आयुक्त सो, श्री. मनोज लोहिया, अपर पोलीस आयुक्त श्री. संजय शिंदे सो, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ - 2, डॉ. काकासाहेब डोळे सो, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री. पद्माकर घनवट सो, देहुरोड विभाग. मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षाराणी पाटील सो, यांचे मार्गदर्शनाखाली देहुरोडे पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. दिगंबर अतिग्रे, सहा. पोलीस निरीक्षक श्री. योगेश गायकवाड, पो.हवा. 794 प्रशांत पवार, पो.हवा. सामिल प्रकाश, पो.ना.1519 सुनिल यादव, पो.शि. 2505 सचिन शेजाळ, पो. शि. 2372 स्वप्निल साबळे, पो.शि. 2184 मोशिन अत्तार, पो.शि. 1507 किशोर परदेशी यांनी केला आहे.

डॉ. काकासाहेब डोळे
पोलीस उप-आयुक्त पिं.चिं.